# आकाशवाणी नागपूर,
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)
# शनिवार दिनांक १८ एप्रिल २०२६

## ठळक बातम्या

1. **पंतप्रधान नरेंद्र मोदी आज रात्री साडेआठ वाजता देशाला संबोधित करणार.**
2. **केंद्रीय मंत्रिमंडळाने केंद्रीय सरकारी कर्मचाऱ्यांसाठी 'महागाई भत्ता' दरा मध्ये केली 2 टक्क्यांची वाढ; प्रधानमंत्री ग्राम सडक योजना- 3 ला मार्च २०२८ पर्यंत सुरू ठेवण्यास दिली मंजुरी.**
3. **संसदेच्या दोन्ही सभागृहाचं कामकाज संस्थगित.**
4. **परतवाडा प्रकरणात बयाण पुरावे देण्यासाठी पिडीतांनी पुढे येण्याच अमरावती पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच आवाहन.**
5. **विदर्भाच्या काही भागांमध्ये 20 ते 22 एप्रिल दरम्यान आभाळी हवामान आणि मेघगर्जनेसह वादळी पावसाची शक्यता.**

## आता सविस्तर बातम्या .......

### पंतप्रधान नरेंद्र मोदी

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज देशाला संबोधित करणार आहेत. रात्री साडेआठ वाजता त्यांचं भाषण होणार आहे.

### केंद्रीय मंत्रिमंडळ निर्णय

केंद्रीय मंत्रिमंडळाने केंद्रीय सरकारी कर्मचाऱ्यांसाठी 'महागाई भत्ता' आणि निवृत्तीवेतनधारकांसाठी 'महागाई दिलासा यांचा अतिरिक्त हप्ता मंजूर करण्यास आज

मंजुरी दिली. ही वाढ या वर्षाच्या १ जानेवारीपासून लागू होईल. महागाईमुळे होणाऱ्या खर्चाची भरपाई करण्यासाठी, मूळ वेतन किंवा निवृत्तीवेतनाच्या सध्याच्या ५८ टक्के दरामध्ये 2 टक्क्यांची वाढ करण्यात आली आहे. मंत्रिमंडळ बैठकीनंतर नवी दिल्ली येथे प्रसारमाध्यमांना माहिती देताना, केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी या दोन्ही भत्त्यामध्ये झालेल्या वाढीमुळे सरकारी तिजोरीवर पडणा-या आर्थिक भाराबद्दल सांगितल

दरम्यान मंत्रिमंडळाने 'प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेचा' (PMGSY-III) विस्तार मार्च २०२५ नंतरही, मार्च २०२८ पर्यंत सुरू ठेवण्यास मंजुरी दिली आहे. या योजनेअंतर्गत गावे आणि वस्त्यांना 'ग्रामीण कृषी बाजारपेठा' उच्च माध्यमिक शाळा आणि रुग्णालयांशी जोडणाऱ्या मुख्य ग्रामीण रस्त्यांचे आणि जोडमार्गांचे बळकटीकरण आणि एकत्रीकरण केले जाईल. या योजनेसाठी सुधारित आर्थिक तरतूद ८३,९७७ कोटी रुपये असेल अशी माहिती वैष्णव यांनी दिली. आज 'भारत सागरी विमा कोष' नावाचा एक देशांतर्गत विमा कोष स्थापन करण्यासही केंद्रीय मंत्रीमंडळाने मंजुरी दिली. अखंडित सागरी विमा संरक्षण उपलब्ध करून देण्यासाठी, या कोशाला १२,९८० कोटी रुपयांची 'सार्वभौम हमी' देण्यात आली आहे. या कोषाच्या माध्यमातून कोणत्याही आंतरराष्ट्रीय ठिकाणावरून भारतीय बंदरांपर्यंत आणि भारतीय बंदरांवरून आंतरराष्ट्रीय ठिकाणी माल वाहून नेणाऱ्या जहाजांसाठी भारतीय व्यापाराला परवडणारे विमा संरक्षण सातत्याने उपलब्ध राहणार आहे.

संसद स्थगित

संसदेच्या दोन्ही सभागृहाचं कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब करण्यात आलं असून विस्तारित अर्थसंकल्पीय अधिवेशन आज संस्थगित झालं. २८ जानेवारीला या अधिवेशनाला सुरुवात झाली होती.या अधिवेशनात लोकसभेच्या एकूण ४१ बैठका झाल्या, यात ९३ टक्के कामकाज झालं असं सभापती ओम बिरला यांनी सांगितलं. अधिवेशनात बारा विधेयकं सभागृहात सादर झाली, यातली ९ विधेयकं मंजूर झाली. राज्यसभेचं कामकाज १५७ तास चाललं. राज्यसभेचे उपाध्यक्ष म्हणून हरिवंश यांची फेरनिवडही या अधिवेशनात झाली. संविधानाची १३१ वी दुरुस्ती विधेयक लोकसभेत

मंजूर होऊ शकलं नाही. यासाठी झालेल्या विशेष अधिवेशनात ५२८ सदस्यांनी मतदान केलं. त्यापैकी विधेयकाच्या बाजूने २९८ मतं, तर विरोधात २३० मतं पडली. घटना दुरुस्ती विधेयक संमत होण्यासाठी दोन तृतीयांश मतांची आवश्यकता असते. तेवढी मतं मिळाली नसल्याने हे विधेयक मंजूर झालं नसल्याचं सभापती ओम बिरला यांनी जाहीर केलं.दरम्यान,या विधेयकाशी संबंधित इतर विधेयकं मागे घेत असल्याचं संसदीय कार्यमंत्री किरेन रीजीजू यांनी जाहीर केलं.

परतवाडा प्रकरण

परतवाडा येथील एका युवकाने असंख्य महिलांशी गैरवर्तन करून त्याचे व्हिडिओ समाज माध्यमांवर प्रसारित केले आहे. याबाबत पोलिसांनी पुढाकार घेऊन गुन्हा नोंदवला आहे. यामध्ये पिडितांनी बयाण आणि पुरावे देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.बावनकुळे यांनी आज जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या कार्यालयाला भेट देऊन याप्रकरणी सविस्तर माहिती जाणून घेतली. यावेळी पोलीस आयुक्त राकेश ओला, जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद आदी उपस्थित होते.याप्रकरणी अद्यापपर्यंत आठ आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून सात मोबाईल, एक टॅब, लॅपटॉप, हार्ड डिस्क ताब्यात घेतली आहे. याची फॉरेन्सिक तपासणीसाठी करण्यात येत आहे. याप्रकरणी एक पंधरा वर्षीय पिडीत मुलगी बयाण देण्यासाठी पुढे आले आहे. परतवाडा येथील प्रकरणी माध्यमांमध्ये विविध वृत्त येत आहेत. त्यामुळे याप्रकरणी पीडित बयाण देण्यासाठी पुढे येण्यास समस्या निर्माण होऊ शकत असल्यामुळे माध्यमांनीही सजगपणे वार्तांकन करावे. तसेच धर्मांमध्ये तेढ निर्माण होऊन सामाजिक सलोखा बिघडू नये, याप्रकरणी पोलिसांकडून देण्यात येणारी माहिती अधिकृत समजावी, असे बावनकुळे यांनी सांगितले आहे.

हवामान

हवामान आज विदर्भात सर्वात जास्त तापमानाची नोंद अमरावती येथे 44 पुर्णांक 4 अंश सेल्सिअस तर अकोला नागपूर वाशिम येथे 44 अंश सेल्सिअस तापमान नोंदवण्यात आला आहे सर्व शहरांचे तापमान चाळीस अंश सेल्सिसच्या वर चोर आहेत

दरम्यान  प्रामुख्याने घाट परिसर, खानदेश, मराठवाडा आणि विदर्भाच्या काही भागांमध्ये 20 ते 22 एप्रिल दरम्यान दुपारनंतर काही प्रमाणात आभाळी हवामान आणि मेघगर्जनेसह वादळी पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या कालावधीत विजांचा कडकडाट, पाऊस तसेच काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता आहे. दरम्यान, कृषी मालाचे संरक्षण करण्याचा सल्ला शेतकऱ्यांना देण्यात आला आहे.

सोने चांदी दर

उद्या, १९ एप्रिल रोजी अक्षय्य तृतीया साजरी होत आहे. परंपरेनुसार या दिवशी सोने किंवा चांदी खरेदी करणे शुभ मानले जाते मात्र, ऐन मुहूर्ताच्या आदल्या दिवशीच सोने आणि चांदीच्या दरात  मोठी वाढ  झाली आहे. शुक्रवारी सोन्याच्या दरात किंचित घट झाल्याने ग्राहकांना थोडा दिलासा मिळाला होता. पण शनिवारी बाजार सुरू होताच परिस्थिती बदलली. २४ कॅरेट सोन्याचा दर प्रति तोळा ८१० रुपयांनी वाढून १,५५,७८० रुपयांवर पोहोचला. ८ ग्रॅमसाठी हा दर ६४८ रुपयांनी वाढून १,२४,६२४ रुपये झाला आहे. त्याचप्रमाणे २२ कॅरेट सोन्याचा दर प्रति तोळा ७५० रुपयांनी वाढून १,४२,८०० रुपये झाला आहे, तर १८ कॅरेट सोन्याचा दर ६१० रुपयांनी वाढून १,१६,८४० रुपयांवर गेला आहे एका दिवसातच चांदीच्या किमतीत तब्बल १०,००० रुपयांची वाढ झाली असून आता एक किलो चांदीचा दर २,७५,००० रुपयांवर पोहोचला आहे.

परवाना नूतनीकरण

एटीएस अर्थात ऑटोमॅटिक टेस्टिंग स्टेशन प्रणाली बंद असल्यामुळे रखडलेल्या वाहन परवाना नूतनीकरण प्रक्रियेला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी यावर्षी ऑक्टोबर अखेरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. यामुळे राज्यातल्या टेम्पो, स्कूलबस, रिक्षा यांचा परवाना नूतनीकरण करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. एटीएस प्रणाली अद्ययावत करण्यासाठी ती बंद करण्यात आली होती. त्यामुळे परवाना नूतनीकरणाची प्रक्रियाही ठप्प झाली होती. त्यामुळे १५ लाख वाहतूक व्यावसायिकांना अडचणी येत होत्या. मुदतवाढीमुळे त्यांना दिलासा मिळाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भात पत्र लिहून विनंती केली होती.

निरोप समारंभ

चंद्रपूरचे माजी जिल्हाधिकारी तथा छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी विनय गौडा सर यांच्या कार्यकाळात चंद्रपूर जिल्ह्याने विकासात भरारी घेतली. त्यांच्या नेतृत्वात जिल्ह्याने अनेक पुरस्कार प्राप्त केले. त्यांनी रचलेल्या पायाचा आणखी विस्तार करून चंद्रपुरला प्रगतीपथावर नेण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत, अशी ग्वाही जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी दिली. तर चंद्रपुरचे नाते आणि आठवण कायम स्मरणात राहील. येथील कार्यकाळाबद्दल आपल्याला नेहमी कृतज्ञता आणि अभिमान राहील, अशा भावना चंद्रपुरचे माजी जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी व्यक्त केल्या. जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपुरच्या वतीने आज नुतन जिल्हाधिकारी वसुमना पंत यांचा स्वागत समारंभ आणि माजी जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांचा निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी बोलताना दोन्ही जिल्हाधिकारी बोलत होते.

****